| | |
|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख : १९/१२/२०२५<br>प्रकरण फैल तारीख : १९/१२/२०२५<br>प्रकरण निकाल तारीख : ०९/०३/२०२६<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>०० ०२ १८ |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी एस.के.शेख यांचे समक्ष)

**न्यायनिर्णय**

**(निशाणी क्रमांक २०/ब)**

(**नियमीत फौजदारी प्रकरण क्र.१०६/२०२५**)

श्रीवर्धन पोलीस ठाणे प्रथम खबरी अहवाल क्र.८१/२०२५

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे श्रीवर्धन पोलीस ठाणे<br>(सहा. सरकारी अभियोक्ता श्री. मुकेश पाटील) |
| आरोपी | **सुरज राजेश गंद्रे**, वय ३२ वर्ष,<br>रा. वाणी आळी, श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड<br>(श्री. संतोष सापते विधीज्ञ) |

| | |
|---|---|
| घटना तारीख | ०९/०९/२०२५ व ०७/१०/२०२५ |
| पहिली खबर दिनांक | ०९/१०/२०२५ |
| दोषारोप दाखल दिनांक | १९/१२/२०२५ |
| आरोप निश्चितीचा दिनांक | ०५/०२/२०२६ |
| संपरीक्षा सुरु झाल्याचे दिनांक | ०५/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय | ०९/०३/२०२६ |
| अंतिम आदेश | आरोपीला निर्दोष करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| अनुक्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीच्या अटकेचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष अथवा शिक्षा | शिक्षा | फौ.प्र.सं.चे कलम ४२८ अन्वये कारागृहात व्यतित केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरज राजेश गंद्रे | १०/१०/२५ | १०/१०/२५ | भा.न्या.सं.चे कलम ७४ अन्वये | निर्दोष | निर्दोष सोडण्यात आले | काही नाही. |

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.१ | निधी राम काजारे | फिर्यादी |
| सा.क्र. १ | राम गोपाळ काजारे | फिर्यादीचे वडील |

## आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## न्यायालयीन साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## आरोपीतर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## न्यायालयातर्फे निशाणी दिलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## मुद्देमाल

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

आरोपीची प्रस्तुत खटल्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४ अन्वये संपरीक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, आरोपी हा श्रीवर्धन येथील

रहिवासी असून आरोपीच्या मालकीचे श्रीवर्धन शहरात त्याचे एच.पी. गॅस कंपनीचे ऑफीस आहे. सदर ऑफीसमध्ये फिर्यादी घटनेच्या ३ महिन्यापुर्वी पासून काम करत होती. दि.०९/०९/२०२५ रोजी फिर्यादी सदरच्या ऑफीसमध्ये काम करत असताना आरोपीने फिर्यादीस त्याच्या कॅबीनमध्ये बोलावून फिर्यादी सोबत बोलत असताना फिर्यादीचा हात पकडला व कमरेला हात लावला. तसेच तुला १८ वर्ष पुर्ण झाले आहे का, तु कधी पॉर्न व्हीडीओ पाहिला आहेस का, मी तुला पॉर्न व्हीडीओ दाखवु का असे बोलून फिर्यादीच्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यानंतर दि.०७/१०/२०२५ रोजी आरोपीने फिर्यादीस त्याचे कॅबीनमध्ये बोलावून फिर्यादीच्या कॉलेजच्या असायमेंटबाबत फिर्यादीसोबत बोलत असताना आरोपीने फिर्यादीला त्याचे जवळ ओढून पाठीमागून फिर्यादीच्या छातीला हात लावला त्यामुळे फिर्यादीच्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यानंतर दि.०९/१०/२०२५ रोजी आरोपीच्या सदरच्या कृत्याविरोधात श्रीवर्धन पोलीस स्टेशन येथे येवून फिर्याद दाखल केली. म्हणुन ही प्रस्तुतची फिर्याद.

३. सदर फिर्यादीआधारे श्रीवर्धन पोलीस ठाणेत गु. र. नं. ८१/२०२५ भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. श्री. पी.आर. पाटील, पोलीस नाईक यांनी केसचा तपास करून दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द नि.क्र.११ वर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४ अन्वये दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपीला वाचून व त्याला त्याच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपीने त्यास नकार देऊन संपरिक्षेची मागणी केली.

५. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ (फिर्यादी)व साक्षीदार क्र.२ (फिर्यादीचे वडील) यांच्या साक्षी अनुक्रमे निशाणी क्र.१५ व १६ वर नोंदवून घेतल्या आहेत.

६. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व आरोपी यांच्यातील वाद मिटलेला असुन प्रस्तुत प्रकरणात पुरसीस निशाणी क्र.१३ वर दाखल केली आहे. पुरसीसवर फिर्यादी व आरोपीची सही आहे. आरोपीचा गुन्हयाशी संबंध दर्शविणारा कोणताही पुरावा न आल्याने त्याचे

भारतीय नागरी सुरक्षा संहिताचे कलम ३५१ खाली निवेदन नोंदविण्यात आले नाही.

७. अभियोग पक्षाचे कथन आणि पुरावा तसेच आरोपीच्या बचावाचा विचार करता पुढील विचाराधीन मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित झाले असुन त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०९/०९/२०२५ व ०७/१०/२०२५ रोजी आरोपीने त्याच्या मालकीचे वाणी आळी, श्रीवर्धन, रायगड येथे असलेल्या एच.पी.गॅस कंपनीच्या ऑफीसमध्ये फिर्यादीचा हात पकडून तिच्या कमेरला हात लावला, फिर्यादीस पॉर्न व्हीडीओ पाहण्यास प्रोत्साहित केले व फिर्यादीला त्याच्याकडे ओढून फिर्यादीच्या छातीला हात लावून तिच्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले व त्याद्वारे आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **<u>कारणमीमांसा</u>** :

**<u>मुद्दा क्र.१ करीता :–</u>**

८. साक्षीदार क्र.१ हे सदर केसमधील फिर्यादी. साक्षीदार क्र.२ फिर्यादीचे वडील आहेत. सदरच्या साक्षीदाराने व आरोपीने नि.क्र.१३ वर पुरसीस दाखल करुन सदर केसमध्ये त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे सांगीतले आहे. तसेच फिर्यादीने नि.क्र.१४ पुरशीस दाखल करुन तिने आरोपीविरोधात गैरसमजुतीतून गुन्हा दाखल केला होता तसेच त्यांची आरोपीविरोधात कोणतीही तक्रार नाही असे सांगितले आहे. त्या अनुषंगाने फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये कोणताही वाद राहिलेला नाही असे सांगितले आहे.

९. साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांनी तिच्या सरतपासामध्ये असे सांगीतले आहे की, त्या आरोपीच्या ऑफीमध्ये काम करत होत्या. आरोपीच्या ऑफीसमध्ये काम करत असताना

त्यांची आरोपीसोबत कोणतीही घटना घडलेली नव्हती. फिर्यादीने फिर्यादमधील नमुद घटनाच नाकारलेली आहे. उलट फिर्यादीने त्या आरोपीच्या ऑफीसमध्ये काम करत असताना आरोपीने त्यांच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कोणतेही कृत्य केले नसल्याचे कथन केले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादी हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेने तिचा उलटतपास घेतला असता सदर उलटतपासात देखील आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणणेस अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. उलट फिर्यादीने आरोपीसोबत त्यांनी कोर्टाबाहेर तडजोड केली आहे, तिची आरोपीविरुद्ध कोणतीही तक्रार नसलेचे सांगितले आहे. यावरुन फिर्यादी अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेचे दिसून येते.

१०. साक्षीदार क्र.२ फिर्यादीचे वडील यांनी त्याच्या सरतपासात सांगितले आहे की, फिर्यादी त्यांची मुलगी असून ती आरोपीच्या ऑफीसमध्ये काम करत होती. आरोपीसोबत त्यांच्या मुलीची कोणतीही घटना घडलेली नाही. तसेच आरोपीने त्यांच्या मुलीसोबत कोणतेही वाईट कृत्य केले नव्हते. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेने त्यांचा उलटतपास घेतला असता सदर उलटतपासात देखील आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणणेस अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. यावरुन सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेचे दिसून येते.

११. सदर साक्षीदारांच्या पुराव्यावरून आरोपी व त्यांच्यातील वाद मिटलेला असून तडजोड झालेली आहे असे दिसून येते व ही बाब सदर साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केली आहे. त्यामुळे आरोपीविरूद्ध सदर साक्षीदार काहीही कथन करण्यास इच्छीत नाही असे स्पष्ट होते. फिर्यादीने घटना नाकारल्यामूळे आरोपीने फिर्यादीचा हात धरुन तिच्या कमरेला हात लावला, तिला पॉर्न व्हीडओ पाहण्यास प्रोत्साहित केले व फिर्यादीस त्याच्याकडे ओढून तिची छाती दाबून विनयभंग केला ही बाब सिद्ध होत नाही. अभिलेखावर कोणताही तोंडी पुरावा आलेला नाही की, ज्या आधारे असे म्हणता येईल की, आरोपीने भारतीय न्याय संहिता कलम ७४ अन्वये खालील दंडनीय गुन्हा केला आहे. सबब मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करीता** :-

११. मुद्दा क्र.१ चे निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.२ करीता मी खालील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी सुरज राजेश गंद्रे यास भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या दोषारोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे जामिन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे रुपये १५,०००/- चा जामीन दयावा. |
| ४. | जप्त मुद्देमाल म्हणजेच १ ॲपल कंपनीचा पांढऱ्या रंगाचा ज्याचा IMEI NO.353354142534696, 353354142508468 असलेला मोबाईल यापूर्वी मूळ मालकास सुपूतनाम्यावर दिला असल्यास त्याचा ताबा अपील कालावधीनंतर कायम करण्यात येतो व बंधपत्र अपील कालावधीनंतर रद्द करण्यात येते. जर मोबाईल हा यापूर्वी सुपूतनाम्यावर परत दिला नसल्यास, सहा महिन्याच्या मुदतीत कोणीही अर्ज न केल्यास जप्त मोबाईलाचा शासकीय लिलाव करुन येणारी रक्कम सरकार जमा करण्यात यावी. |
| ५. | सदर निकालाची प्रत जिल्हाधिकारी रायगड यांना पाठविण्यात यावी. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

SAMEER KADER SHAIKH
Digitally signed by SAMEER KADER SHAIKH
Date: 2026.03.11 17:10:56 +0530

दि.०९/०३/२०२६

**(एस. के. शेख)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन

## प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, या पी.डी.एफ. फाईल न्यायनिर्णयातील आशय हा मूळ न्यायनिर्णयातील शब्दा शब्दा प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | श्री. एस. के. शेख प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड. |
| लघुलेखकाचे नाव | : | श्री. राहुल सुनिल मराठे (श्रेणी–३) |
| न्यायनिर्णयाची दिनांक | : | ०९/०३/२०२६ |
| पिठासिन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | : | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : | ११/०३/२०२६ |